# बोर्ड प्रश्नपत्रिका : जुलै २०१६

## इतिहास व राज्यशास्त्र

**वेळ : २ तास** **एकूण गुण : ४०**

**सूचना:**

i. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

ii. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

iii. १ ते ५ प्रश्न इतिहास व ६ ते ९ प्रश्न राज्यशास्त्र या विषयावरील आहेत.

**प्र.१. (अ) कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा:** **[३]**

१. इ.स. १४५३ मध्ये _______ हे ठिकाण ऑटोमन तुर्कांनी जिंकून घेतले.
(कॉन्स्टॅन्टिनोपल, कालिकत, कोलकाता)

२. वास्को-द-गामा याने कालिकत येथील _______ राजाकडून व्यापारी सवलती मिळविल्या.
(जहांगीर, झामोरीन, शहाआलम)

३. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात आफ्रिकेत ‘वसाहत’ निर्माण करण्याचा पहिला मान _______ ने पटकाविला.
(इंग्लंड, फ्रान्स, बेल्जियम)

**(ब) ‘अ’ स्तंभातील घटकांशी ‘ब’स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा:** **[३]**

| | ‘अ’ स्तंभ | | ‘ब’ स्तंभ |
|---|---|---|---|
| १. | राष्ट्रसंघाचे मुख्य कार्यालय | अ. | पंडित नेहरू |
| २. | अलिप्ततावादी चळवळ | ब. | निकिता क्रुश्चेव्ह |
| ३. | जी-७ मधील राष्ट्र | क. | जिनिव्हा |
| | | ड. | कॅनडा |

**प्र.२. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा (कोणतेही दोन):** **[४]**

१. पारंपरिक साम्राज्यवादाचे स्वरूप स्पष्ट करा.

२. राष्ट्रसंघाची उद्‌दिष्टे कोणती होती?

३. आंतरराष्ट्रीय न्यायालयाची माहिती द्या.

**प्र.३. खालील विधानांची कारणे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा (कोणतेही दोन):** **[४]**

१. जर्मन प्रजासत्ताक सरकारविषयी हिटलरच्या मनात तीव्र संताप होता.

२. महात्मा गांधींनी असहकार चळवळ स्थगित केली.

३. शीतयुद्धाने अण्वस्त्रस्पर्धेला प्रोत्साहन मिळाले.

**प्र.४. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३० ते ४० शब्दांत लिहा (कोणतेही दोन):** **[६]**

१. इंग्लंड, फ्रान्स, रशिया या राष्ट्रांना बाल्कन प्रदेशाचे महत्त्व का वाटत होते?

२. ‘रक्तरंजित रविवार’ बद्दलची माहिती लिहा.

३. युरोपीय साम्राज्यवादी राष्ट्रांना वसाहती सोडून जाणे का भाग पडले?

**प्र.५. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ६० ते ८० शब्दांत लिहा (कोणतेही दोन):** **[८]**

१. इंग्रजांनी भारतात आपला एकछत्री अंमल कसा सुरू केला?

२. दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम लिहा.

३. कृत्रिम उपग्रहाची सविस्तर माहिती लिहा.

**प्र.६. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा:** **[३]**

१. आपण दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ आहोत अशा दाव्यांमुळे ________ निर्माण होते.

(समानता, संघर्ष, विषमता, सामंजस्य)

२. ________ हा लोकशाही व्यवस्थेचा गाभा असतो.

(लोक, प्रतिनिधी, पंतप्रधान, लोकसहभाग)

३. आजही ________ या देशात स्त्रियांना मतदानाचा अधिकार नाही.

(पाकिस्तान, बांग्लादेश, इराक, संयुक्त अरब अमिरात)

**प्र.७. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही तीन):** **[३]**

१. प्रत्यावाहन म्हणजे काय?

२. राजकीय पक्ष म्हणजे काय?

३. भारतात जातिप्रथा नाहीशी करण्यासाठी कोणी प्रयत्न केले?

४. राज्यस्तरीय किंवा प्रादेशिक पक्ष म्हणजे काय?

५. प्रादेशिक विषमता म्हणजे काय?

**प्र.८. खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन):** **[४]**

१. भारतात अध्यक्षीय लोकशाही आहे.

२. जनतेचा पुढाकार लोकशाही कमकुवत बनवतो.

३. समान राजकीय भूमिका असलेले लोक राजकीय पक्ष स्थापन करतात.

**प्र.९. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर २५ ते ३० शब्दांत लिहा:** **[२]**

१. आर्थिक विषमता हे लोकशाहीपुढील आव्हान कसे आहे ते सांगा.

२. विविध धर्माचे लोक शांततेने व सलोख्याने राहावेत म्हणून काय उपाय केले जातात?